ISSN 2231-1629
Knowledge Resonance

# अहिंसेचे पुजारी महात्मा गांधी

प्रा. डॉ. राजू भाऊरावजी खरडे
आर.बी. व्यास कला व वाणिज्य महाविद्यालय, कोंढाळी

**प्रस्तावना :**

भारतातील नव्हेतर जगातील महान मानवता वादाचे पुजारी म्हणून गांधीजींची आज संपूर्ण जगाला ओळख पटली आहे. त्यांचा हा मानवता वाद त्यांनी व्यक्त केलेल्या सत्य, अहिंसा, सत्याग्रह, रामराज्य, ग्राम स्वराज्य, ग्रामीण संकल्पना इ. संकल्पनेतून दिसून येते. गांधीजी हे मुळातच मानवतावादी असून त्यांनी सत्य हा मानवी जिवनाचा आधार माणून आपल्या आत्मकथेण त्यांनी 'माझे सत्याचे प्रयोग' हे नाव दिले आहे. सत्या इतकेच महत्व गांधीजींनी अहिंसेला ही दिले आहे. कारण गांधीजी म्हणतात, सत्य आणि अहिंसा एकाच नाण्याच्या दोन बाजू असून त्यांना अलग करता येत नाही. सत्याला अहिंसेची जोड असेल तर जिवनात यशस्वी होवून आत्मीक समाधान मिळू शकते. गांधीजींनी आपल्या जिवनात सत्याबरोबरच अहिंसेला अतिशय महत्वपूर्ण स्थान देवून सत्य आणि अहिंसा या दोन विचारांची महान देणगी जगाला दिलेली आहे. आज अण वस्त्रांच्या युगात आंतरराष्ट्रीय स्तरावर जगातील राष्ट्रांचा एकमेकांवरील विश्वास उडालेला असून, ते एकमेकांवर वर्चस्व निर्माण करण्यासाठी सतत धडपडत आहे. अशा स्थितीत तिसरे महायुध्द झाले तर संपूर्ण मानव जातीचा विनाश झाल्या शिवाय राहणार नाही अशा भयानक स्थितीमध्ये जगाला महायुध्दा पासून फक्त गांधीजींचे अहिंसेचे तत्वच रोखु शकते. हे सत्य जगातील बहुतांश देशाने मान्य केले आहे. त्यामुळे जगातील बहुतांश देशामध्ये गांधीजींच्या अहिंसेच्या संकल्पनेचा पुरस्कार होत आहे. एवढेच नव्हेतर संपूर्ण जगाची संघटना संयुक्त राष्ट्र संघातर्फे 2 आक्टोंबर गांधीजींचा जन्म दिवस हा अहिंसा दिवस म्हणून संपूर्ण जगात पाळला जात असून 21 व्या शतकातील महान व्यक्तिमत्व म्हणून गांधीजींचा आज सर्वत्र स्विकार होत आहे. गांधीजींनी सत्य आणि अहिंसा या तत्वाचे संपूर्ण आयुष्यभर पालन केले आहे. त्याचा प्रभाव भारतासह जगावर होवून ही तत्वे खोलवर रूजण्यास मोठी मदत झाली आहे.

प्राचीन काळापासून अहिंसा या तत्वाला भारताच्या इतिहासात महत्वाचे स्थान असल्याचे दिसून येते. योग दर्शनकार पतंजली यांनी आत्म शुध्दीच्या 5 मंत्रांमध्ये अहिंसेला सर्वात वरचे स्थान दिलेले आहे. तर जैन धर्मात 'अहिंसा परमो धर्म' माणून अहिंसा हि धर्मा पेक्षाही श्रेष्ठ असल्याचे सांगितले आहे. तर भगवान गौतम बुध्दाने अहिंसेचे महत्व प्रतिपादीत करतांना, वैराचा अंत वैराने नाहीतर प्रेमाने झाला पाहिजे असे मत प्रति पादित केले आहे. गांधीजी म्हणतात ज्या ऋषींनी हिंसेच्या वातावरणात अहिंसेचा शोध लावला ते न्युटन पेक्षा ही अधीक प्रतिभा शाली होते. तर वेलिंग्टन पेक्षाही मोठे योध्दा होते.शस्त्रांच्या प्रयोगाचे ज्ञान असल्या नंतर ही त्यांनी त्याची निरूप योगीता ओळखली व तुमची मुक्ती हिंसेत नाही तर अहिंसेत आहे. असे त्यांनी जगाला सांगितले. यावरून अहिंसेला अगदी पुर्वी पासूनच महत्व असल्याचे दिसून येते. असे असले तरी अहिंसा ही 21 व्या शतकात गांधीजींनी जगाला दिलेली महत्वपूर्ण देणगी होय.

गांधीजी म्हणतात, मी नाही, मी स्वतःला एक व्यवहारीक आदर्शवादी मानतो अहिंसा धर्म केवळ ऋषीमुनीं करीताच नाही. ज्याप्रमाणे हिसा पशुचा नियम आहे. त्याचप्रमाणे अहिंसा मानवाचा नियम आहे. मला केवळ एकच मार्ग माहीत आहे. आणि तो म्हणजे अहिंसेचा.

**अहिंसेचे स्वरूप :**

1) अहिंसा मानव जातीचा नियम आहे. आणि ती पाशवी

ISSN 2231-1629
Knowledge Resonance

शक्ती पेक्षा किती तरी महान आणि श्रेष्ठ आहे.

2) प्रेमाच्या ईश्वरावर ज्याची जिवंत श्रध्दा नाही त्यांच्या करीता नियम नाही.

3) अहिंसा मानवाच्या स्वाभिमानाची आणि आत्म संन्मानाचे पूर्णपणे रक्षण करते.

4) अहिंसेच्या मार्गावर चालणाऱ्या व्यक्तींनी आणि राष्ट्रांनी आपली प्रतिष्ठा सोडून बाकी सर्व गोष्टींचे बलीदान करण्याची तयार ठेवली पाहीजे.

5) अहिंसा अशी शक्ती आहे. जी लहान मुले, तरूण स्त्री, पुरूष वा प्रौढ व्यक्ती हे सर्व मिळवू शकतात. अट ऐवढीच आहे की, त्यांची प्रेमाच्या ईश्वरावर जिवंत श्रध्दा असली पाहीजे व संपूर्ण मानव जातीवर त्यांचे सारखेच प्रेम असले पाहीजे.

6) अहिंसेचे नियम व्यक्ती करीता योग्य आहे. परंतु मानव समुहा करीता ते योग्य नाही असे म्हणने चुकीचे आहे.

अहिंसा आणि सत्य यांचा मार्ग तलवारीच्या धारे पेक्षाही तिक्ष्ण आहे. योग्य पध्दतीने अमलात आणल्यास अहिंसेमुळे आत्म्याचे रक्षण होते. अहिंसा आत्म्याचे भोजन असून ते सतत घ्यावे लागते. गांधीजींना दैनंदिन व्यवहारातील अहिंसेचा साधा अर्थ अभिप्रेत नव्हता. त्यांनी अहिंसेचा अधिक व्यापक अर्थ घेतलेला असून गांधीजींच्या मते. अहिंसा म्हणजे केवळ हिंसेचा अभाव नव्हेतर राग, द्वेष, अहंकार, स्वार्थ यांच्या साहयाने इतरांना शरीराने आणि मनाने दुखापत करणे म्हणजे हिंसा होय. परंतु अशा कृती पासुन दुर राहणे म्हणजे अहिंसा होय. ऐवढेच नव्हेतर क्रोधाला प्रेमाने उत्तर देणे, शत्रुत्वाच्या कृतीला मित्रत्वाच्या कृतीने उत्तर देणे म्हणजेच अहिंसा होय. गांधीजी आपल्या अहिंसा तत्वज्ञानामध्ये राग, द्वेष, सुड, अहंकार, हाणामारी इ. गोष्टींना मुळीच स्थान दिले नाही. गांधीजींच्या मते अहिंसे शिवाय सत्याचा शोध आणि त्याची प्रगती अशक्य आहे. अहिंसा सत्याचा आत्मा आहे. आणि सत्याच्या आत्म्यातूनच अहिंसेचा अविष्कार होत असतो. तसेच अहिंसा आणि सत्य या एकाच नाण्याच्या दोन वाजू असून त्या एकमेकांपासून अलग केल्या जावू शकत नाही. कारण अहिंसा हे सत्य आहे, तर हिंसा हि असत्य आहे. अहिंसा साधन आहे. आणि सत्य हे साध्य आहे. साधन तेच असते जे आपल्या आवाक्यात असते आणि अशा रितीने अहिंसा आमचे सर्वात मोठे कर्तव्य आहे. हिंसा म्हणजे क्रोध वासणा, स्वार्थ, आदी प्रवृत्तीना प्रोत्साहण देणे होय तर अहिंसा म्हणजे या सर्वावर मात करून सर्वाप्रती प्रेमाणे वागून त्यांचे हिंसेपासून मुक्ती मिळवणे होय. गांधीजींच्या मते सत्य आणि अहिंसा हि दोन तत्वे सर्वशक्तीमान असून ती ईश्वरासारखी आहे.

आपल्या जिवनात अहिंसेचे अनुकरण करत राहणे, आणि आपले जिवन अहिंसेच्या जिवंत उपदेशासारखे होईल हे पाहणे या शिवाय अहिंसेचा कोणता ही राजमार्ग नाही अर्थात भरपूर अभ्यास केल्या नंतर व प्रचंड चिकाटीने अंतकर्नातील सर्व अशुध्दी दुर केल्या नंतरच आपल्या जिवणात अहिंसेची अभिव्यक्ती होवू शकते. भौतीक विज्ञानात प्राविण्य मिळविण्याकरीता जर सर्वजिवन अर्पावे लागत असेल तर, मानव जातीला ज्ञात असलेली सर्वात महान आध्यात्मीक शक्ती प्राप्त करण्यासाठी जिवन अर्पण करण्याची तयारी असली पाहीजे. ती शक्ती म्हणजे अहिंसा होय. अहिंसा घरी बसून शिकता येत नाही. हिच्या करीता साहस करण्याची गरज आहे. आपली परिक्षा घेण्या करीता धोका आणि मृत्यू यांना आव्हाण देणे, देहदमन करणे आणि सर्व प्रकारच्या अडचणींना तोंड देणे, आपल्याला शिकावे लागतात.

गांधीजींच्या मते अहिंसा हि केवळ भारतासाठीच नव्हेतर संपूर्ण जगासाठी अतिशय महत्वपूर्ण असून जगातील सर्व व्यवहार हे अहिंसेतूनच व्यवस्थितरित्या होवु शकते. कारण प्रेमाची निर्मीती ही फक्त आणि फक्त अहिंसेतूनच निर्माण होणे शक्य आहे. म्हणुन अहिंसा हे सर्वव्यापी व सर्वकालीन नियम असून जिवणाच्या प्रत्येक घटकावर

त्याचा परिणाम होत असतो. अहिंसेचा वापर केला तर इतर गोष्टी या आपोआपच प्राप्त होवु शकते. त्यामुळे गांधीजी म्हणतात की, मला स्वराज्याच्या आगोदर अहिंसा हवी आहे. कारण अहिंसेच्या आधारावरच स्वराज्याची प्राप्ती होवु शकते. आणि खरोखरच गांधीजींनी अहिंसेच्या आधारावरच सर्व चळवळी करून भारताला स्वातंत्र्य मिळवुन दिले आणि आपले शब्द खरे केले.

आज आतंकवाद, युध्द, हिंसा या समस्यांनी जगासामोर मोठे आव्हाने उभी केली आहे. या समसेवर उपाय म्हणुन महासत्ता अमेरीकेकडे जग बघतांना दिसते. परंतू या समस्या सोडविण्यासाठी गांधीजींच्या अहिंसा हया तत्वाचा अवलंब केला तर या गंभिर समस्या समाप्त झाल्या असत्या. दहशतवाद ज्या पाकिस्थानने पोसला तो आज फोफावतांना दिसतो आहे. त्याचा परिणाम म्हणजे अमेरीकेतील 2001 चा दहशतवादी हल्ला, भारतीय संसदेवरील व 26/11 चा मुंबईवरील हल्ला, इतकेचे नव्हे तर दहशतादाचे उगमस्थान असलेल्या पाकिस्थानमधील पेशावर येथील सैनिकीशाळेवरील दहशतवादी हल्ला यातून हेच सिध्द होते की, एकमेकांबाबत हिंसात्मक द्वेष वाढत चाललेला आहे. या हिसात्मक कृत्यांना पायबंद घालण्यासाठी संपूर्ण जगातील राष्ट्रांनी एकत्र ऐवून लढले पाहीजे, तसेच पक्षपाताची भूमिका सोडून, या विरोधी अहिंसक लढा देण्याची आज गरज आहे. कारण गांधीजी म्हणतात जगातील कोणताही प्रश्न सोडविण्यासाठी अहिंसात्मक लढा हा केव्हाही चांगला आहे. कारण त्यामुळे मानव जातीचे नुकसान न होता यश मिळते.

**सारांश :**

महात्मा गांधीचे सत्य आणि अहिंसा तत्व आजही महत्वाचे ठरत आहे. गांधीजींनी अहिंसेच्या आधारावरच वेगवेगळया संकटावर मात केल्याचे दिसुन येते. अहिंसेच्या साधनेतुन प्रत्येक गाव शहर आणि राष्ट्रांना आत्मनिर्भर करण्याची गरज आहे. गांधीजी अहिंसेचे पुजारी होते. त्यांनी **'यंग इंडीया'** या ग्रंथात असे लिहले आहे की, अहिंसा मी बघतो तेंव्हा सत्य मला सांगते. जाणुन घे, आणि जेंव्हा मी सत्याकडे बघतो तेंव्हा मला अहिंसा सांगते मला जाणून घे. म्हणुन सत्याला साध्य करण्यासाठी अहिसा एकच मार्ग आहे आजही याच तत्वाचा अंगीकार सर्वत्र मानवानी करण्याची वेळ आली आहे. हे पुन्हा एकदा सिध्द झाले आहे. गांधीजींमुळे भारतातच नव्हेतर संपूर्ण जगात सत्य आणि अहिंसा या संकल्पनेचा प्रसार होवुन जगामध्ये काही प्रमाणात का होइना परंतु शांतता आणि सुव्यवस्था राखण्यास मोलाची मदत झालेली आहे. त्यामुळेच अहिंसा या तत्वाच्या प्रसारामध्ये महात्मा गांधीजींचे योगदान अतिशय मोलाचे असल्याचे दिसुन येते.

***संदर्भ ग्रंथ :***


1) *महात्मा गांधीजींचे विचार : संपादन आर.के. प्रभु आणि यु.आर. राव.*
*नवजीवन प्रकाशन मंदीर अहमदाबाद 2010*
2) *आधुनिक भारत : श.द. जावडेकर,कान्टीनेंटल प्रकाशन पुणे*
3) *सत्याचे प्रयोग : महात्मा गांधी*
4) *राजकिय विचार आणि विचारवंत : डॉ. व.गो. नांदेडकर, डायमंड प्रकाशन पूणे 2011*
5) *आधुनिक भारतीय राजकीय विचार संहिता आणि संदर्भ : विद्युत चक्रवर्ती, राजेंद्र पांडे*
6) *भारतीय राजकीय विचारवंत : डॉ. वी.मा. बाचल, सागर प्रकाशन*
7) *गांधी : नलिनी पंडीत*
8) *दोन दिवसीय आंतरराष्ट्रीय परिषद On Signification of Mahatma Gandhi*
9) *Methodology in 21th Century 30/31 Jan. 2015 Souvenir*